# परदेशी वैद्यकीय उपचारांसाठीच्या परदेशी चलनविषयक कार्यपद्धतीचे उदारीकरण

**सप्टेंबर ६, २००२**

परदेशी वैद्यकीय उपचारांसाठी निवासी व्यक्तींना सहज व सत्वर परकीय चलन उपलब्ध करुन देण्यासाठी आता असे ठरविण्यात येत आहे की अधिकृत विक्रेते, ५०,००० अमेरिकन डॉलर पर्यंत परकीय चलन भारताबाहेर वैद्यकीय उपचार घेण्यासाठी, डॉक्टर किंवा हॉस्पिटलकडून खर्चाचा अंदाज मिळण्याचा आग्रह न धरता, अर्जदाराच्या आवश्यकते संबंधीच्या निवेदनाच्या आधारे देऊ शकतात, मात्र अशा परकीय चलनाचे प्रदान हे चेकने अगर अर्जदाराच्या खात्यावर नावे टाकून मिळालेले असायला हवे.

प्रचलित नियमांनुसार, निवासी व्यक्ति भारताबाहेरील वैद्यकीय उपचारांसाठीचे परकीय चलन, उपचारांसाठीच्या खर्चाचा डॉक्टर किंवा हॉस्पिटलने दिलेला अंदाज सादर करुन खरेदी करु शकतात.

रिझर्व्ह बँक, निवासी भारतीयांच्या परकीय चलन व्यवहारां संबंधीच्या प्रचलित नियमांचे पुनरावलोकन करत आहे आणि नजीकच्या भूतकाळात कर्यपद्धती सोप्या करण्यासाठी व प्रचलित कार्यपद्धतींच्या उदारीकरणासाठी अनेक उपाय करण्यात आले आहेत. या दिशेने पुढचे पाऊल म्हणून वैद्यकीय उपचारांसाठी परकीय चलन देण्याची कार्यपद्धत आणखी सोपी केली जात आहे.
अधिकृत विक्रेत्यांना सुधारित कार्यपद्धती बद्दलच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या जात आहेत.

**अल्पना किल्लावाला**
**महा व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००२-२००३ /२६४**